# भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा राखण्याचा हक्क अधिनियम 2013 चे कलम 19 मधील पोट कलम (7) मधील दुसरे परंतुक अन्वये अधिसुचना

ज्याअर्थी भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा राखण्याचा हक्क अधिनियम 2013 अन्वये भूसंपादन प्रस्ताव क्रमांक 01/2019 मौजे डनेल ता.अक्कलकुवा जि.नंदुरबार येथील सरदार सरोवर प्रकल्पासाठी गट नं. 167/1/अ, 1ब, 1क क्षेत्र अनुक्रमे 0.59, 0.59, व 0.60 एकुण 1.78 हे.आर. क्षेत्राचे भूसंपादन होणाऱ्या खाजगी जमिनीची कलम 11 ची अधिसूचना दि.20/03/2020 रोजी ग्रामपंचायत मौजे डनेल ता. अक्कलकुवा येथील नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत आली आहे.

आणि ज्याअर्थी, सहायक जिल्हाधिकारी तळोदा भाग तळोदा यांचेकडील पत्र क्रमांक/भूंस/कावि/20/2021 दि. 11/01/2021 अन्वये कलम 19 ची अधिसूचना मंजुरीस्तव या कार्यालयास प्राप्त झाली आहे. उक्त प्रस्तावात कलम 11 ची अधिसुचना प्रसिध्द झालेपासून 12 महिन्याचे आत म्हणजेच दि.20/03/2021 पर्यंत कलम 19 ची अधिसूचना घोषित करणे आवश्यक होते. तथापि सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयातील भूसंपादन शाखेतील अधिकारी/कर्मचारी कोरोना पॉझीटीव झाल्यामुळे तसेच कोरोना विषयक कामकाजात व्यस्त असल्यामुळे विहीत कालावधीत कलम 19 ची अधिसूचना घोषीत करता आलेली नाही.

आणि ज्याअर्थी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा राखण्याचा हक्क अधिनियम 2013 चे कलम 19 मधील पोट कलम (7) मधील दुसरे परंतुक नुसार, समुचित शासनाच्या मते,जर कालावधी वाढविण्याचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात असेल तर, त्याला बारा महिन्याचा कालावधी वाढ करण्याचा अधिकार असेल, तसेच कालावधी वाढविण्याचा असा कोणताही निर्णय, लेखी स्वरुपात नोंदविण्यात येईल आणि संबंधित प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत येईल, असे नमुद आहे.

त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम 19 मधील पोट कलम (7) मधील दुसरे परंतुक नुसार समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये भूसंपादन प्रस्ताव 01/2019 मौजे डनेल ता.अक्कलकुवा जि.नंदुरबार येथील सरदार सरोवर प्रकल्पासाठी संपादीत होणाऱ्या खाजगी जमिनीची भूसंपादनाबाबत भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा राखण्याचा हक्क अधिनियम 2013 चे कलम 19 ची अधिसूचना प्रसिध्दीची कार्यवाही पार पाडण्यासाठी सहायक जिल्हाधिकारी तळोदा भाग तळोदा यांना दिनांक 20/03/2021 पासुन पुढील 6 महिन्यांची मुदत वाढ याव्दारे देण्यात येत आहे. सदर अधिसुचनेस नंदुरबार जिल्हयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी.

नंदुरबार,
दि.14 जून, 2021

(डॉ राजेंद्र भारुड)
जिल्हाधिकारी नंदुरबार
तथा समुचित प्रशासन, नंदुरबार

Scanned by CamScanner